PUBLICATION – MAHARASHTRA TIMES
DATE – NOVEMBER 24, 2015
PAGE NO. – 7

# स्टार्ट-अप्ससाठी 'पुणे कनेक्ट'

**पुणे :** आयटीच्या क्षेत्रातील वेगवेगळ्या स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी सॉफ्टवेअर एक्सपोर्टर्स असोसिएशन ऑफ पुणेतर्फे (सीप) येत्या शनिवारी (२८ नोव्हेंबर) पुणे कनेक्ट २०१५चे आयोजन करण्यात आले आहे. 'हॉटेल वेस्टिन'मध्ये आयोजित या उपक्रमासाठी यंदा 'इनोव्हेशंन इन द डिजिटल वर्ल्ड' ही मुख्य संकल्पना निवडली आहे.

'सीप'चे अध्यक्ष एस. रामप्रसाद यांनी पत्रकार परिषदेत या उपक्रमाच्या आयोजनाविषयी सोमवारी माहिती दिली. 'सीप'ने सलग पाचव्यांदा या वार्षिक उपक्रमाचे आयोजन केले आहे. गेल्या काही वर्षांपासून या उपक्रमाला स्टार्टअप्सकडून वाढता प्रतिसाद आहे. उपक्रमाच्या माध्यमातून स्टार्टअप्सना गुंतवणूकदार आणि आपल्याचसारखे काम करणाऱ्या इतर संस्था-संघटनांशी काम करण्याची थेट संधी मिळते. त्यातून आयटीच्या क्षेत्रात प्रगती करण्यालाही चालना मिळते. त्यामुळेच यंदा १८०हून अधिक कंपन्यांनी या उपक्रमासाठी प्रकल्प पाठविल्याचे रामप्रसाद यांनी सांगितले.